मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 26 नोव्हेंबर 2025 | पान- 1

# महाविकास आघाडीकडून पिंपरीत मतदार यादीची होळी

## महापालिकेच्या प्रवेश द्वारावर प्रतिकात्मक मतदार याद्या जाळून निवडणूक विभागाचा निषेध

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकने आगामी पालिका निवडणुकीसाठी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप मतदार याद्या बाबत महाविकास आघाडी आक्रमक झाली असून त्यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रवेश द्वारावर प्रतिकात्मक मतदार याद्या जाळून महिपालिकेच्या निवडणूक विभागाचा निषेध व्यक्त केला आहे.

यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार गौतम चाबुकस्वार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, नेत्या सुलक्षणा शीलवंत धर, काँग्रेसच्या नेत्या मनीषा गरुड यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





पिंपरी चिंचवड महापालिका प्रवेशद्वारासमोर महाविकास आघाडीचे वतीने हे आंदोलन करण्यात आले. मतदार याद्या जाळून पालिका प्रशासन तसेच निवडणूक विभागाचा निषेध व्यक्त करण्यात आला. भारतीय जनता पक्षाच्या सांगण्यावरूनच निवडणूक आयोग या याद्या बनवत असल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी यावेळी केला आहे.

दरम्यान अशा याद्या घेऊन आम्ही निवडणुकीला का सामोरे जाऊ असं म्हणत आम्ही या प्रतिकात्मक याद्या जाळल्या आहेत. निवडणूक विभागाने या याद्यामधील असलेल्या त्रुटी आधी दूर कराव्यात मगच निवडणुका कराव्यात अशी मागणी ही महाविकास आघाडीने केली आहे.

# निगडी, मुकाई चौक ते किवळे परिसर होणार "मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब"

## आमदार शंकर जगताप; निगडी ते मुकाई चौक किवळे या नव्या बीआरटी मार्गावर बससेवा सुरु

**पिंपरी | प्रतिनीधी**

निगडी-मुकाई चौक, किवळे परिसर ते वाघोली दरम्यान साधारण 32 किलोमीटर रस्ता 'फास्ट ट्रॅक कॉरिडॉर' विकसित करण्याचे नियोजन सुरू आहे. याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिका आणि पीएमपीएमएल यांच्या माध्यमातून विकसित करण्यात आलेल्या निगडी ते मुकाई चौक किवळे बीआरटी कॉरिडॉरवर बससेवा सुरू करण्यात आली आहे. निगडी भक्तीशक्ती चौकापासून ट्रान्सपोर्ट नगर मार्गे मुकाई चौकपर्यंतच्या या नव्या मार्गामुळे नागरिकांना जलद, सुरक्षित आणि सुलभ प्रवासाची सुविधा मिळणार असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले. आगामी काळात हा परिसर "मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब" म्हणून विकसित करणार असल्याचा विश्वासही जगताप यांनी व्यक्त केला.

पिंपरी चिंचवड परिसर प्रचंड वेगाने वाढत आहे. त्यामुळे येथील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी आमदार शंकर जगताप प्रचंड पाठपुरावा करत आहेत. वेळोवेळी प्रशासनाला सूचना देत अनेक बदल केले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर वाघोली, औंध, हिंजवडी या भागांमध्ये आयटी उद्योग मोठ्या प्रमाणात असून या ठिकाणी वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी सार्वजनिक वाहतूक सेवा सक्षम करण्याचे नियोजन सुरू आहे आहे. या भागांमध्ये जाण्यासाठी पिंपरी चिंचवडमधून मोठ्या प्रमाणात उद्योजक, नोकरदार, विद्यार्थी ये जा करतात. अशा वेळी खाजगी गाड्या मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आल्यानंतर



वाहतुकीवर ताण निर्माण होतो. यासाठी मेट्रो सेवांचे विस्तारीकरण आणि त्यासोबतच पीएमपीएल बसेससाठी समर्पित बीआरटी लेनची "फास्ट ट्रॅक कॉरिडॉर" व्यवस्था व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी आमदार शंकर जगताप यांनी पाठपुरावा केला.

याच अनुषंगाने निगडी ते मुकाई चौक, किवळे बी आर टी हा कॅरिडॉर सुरू करण्यात आला आहे. यामुळे पिंपरी चिंचवड आणि पुणे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या मार्गावरून (कंसात बस क्रमांक) निगडी ते आकुर्डी स्टेशन( 303), निगडी ते गहुंजे (303A), निगडी ते पिंपरी गुरव( 319), निगडी ते हिंजवडी फेज तीन (375), निगडी ते मुकाई चौक( 365)भोसरी ते मुकाई चौक (367) या बस धावणार आहेत.

### हे मार्ग सुरु करण्याचे दिले निर्देश..

» दरम्यान मुकाई चौक ते भक्ती- शक्ती बीआरटी रस्ता वाहतुकीसाठी पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाला असल्याने शहरातील बंद केलेल्या किवळे ते लोहगाव विमानतळ, किवळे ते स्वारगेट, किवळे ते आळंदी, किवळे ते चाकण एमआयडीसी व देहूरोड ते पिंपरीगाव या मार्गावरील बससेवा तसेच सकाळ-सायंकाळ किवळे ते हिंजवडी फेज-३ या मार्गावर जास्तीत जास्त बसेस सुरु करण्याचे निर्देश पीएमपीएल प्रशासनाला दिले असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.

### अंतर्गत भागातील प्रवाशांना मोठा दिलासा..

» मुकाई चौक – किवळे हे मुंबई बंगळुरू बायपासवरील पिंपरी चिंचवड शहराचे महत्त्वाचे प्रवेशद्वार मानले जाते. मुंबईहून येणाऱ्या एसटी तसेच खाजगी प्रवासी वाहनांचा येथे नियमित थांबा असतो. त्यामुळे शहराच्या अंतर्गत भागात जाणाऱ्या प्रवाशांना या नव्या बससेवेचा मोठा लाभ होणार आहे. इस्कॉन रावेत, निगडी, आकुर्डी, भोसरी आदी परिसरात आता अधिक सुलभ प्रवास सुविधा उपलब्ध होणार आहेत.

# प्रारूप मतदार यादीवरील नागरिकांच्या हरकती व सूचनांचे सूक्ष्म नियोजन करा

## प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचनांसह निवडणुक संबधित अन्य विषयांचा घेतला आढावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचा मतदानाचा मूलभूत हक्क अबाधित राहण्यासाठी प्रत्येक मतदाराची नोंद बरोबर व अद्ययावत असणे अत्यावश्यक आहे. यासाठी नागरिकांची माहिती — नाव, पत्ता, वय, सुधारणा, नवीन समावेश आणि वगळण्यात आलेल्या नोंदी — यांची व्यवस्थित पडताळणी होणे आवश्यक आहे. यासाठी प्रारूप मतदार यादीच्या प्रक्रियेत नागरिकांच्या हरकती व सूचना प्रभावीपणे स्वीकारून त्या सोडविण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त व प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.



प्रारूप मतदार यादीवरील नागरिकांच्या हरकती व सूचनांचा आढावा बैठक आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात पार पडली. यावेळी आयुक्त हर्डीकर बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, सह आयुक्त मनोज लोणकर, शहर अभियंता मकरंद निकम, निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी विजयराज यादव, सहाय्यक संचालक नगररचना प्रशांत शिंपी, मुख्य अभियंता प्रमोद, संजय कुलकर्णी,ओंभासे, सह शहर अभियंता बापू गायकवाड, उपायुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, डॉ. प्रदीप ठेंगल, सचिन पवार, सिताराम बहुरे, संदीप खोत, पंकज पाटील, अतुल पाटील, अमित पंडित, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, तानाजी नरळे, पूजा दूधनाळे, अश्विनी गायकवाड, कार्यकारी अभियंता संध्या वाघ, प्रशासन अधिकारी सरीता मारणे, संगीता घोडेकर-बांगर, कार्यालय अधीक्षक रमेश यादव, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच निवडणूक कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त हर्डीकर यांनी पुढे सांगितले की, प्रारूप मतदार यादीवरील नागरिकांच्या हरकती व सूचनांचे सूक्ष्म नियोजन ही निवडणूक प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. प्रत्येक नागरिकाचा मताधिकार प्रभावीपणे सुनिश्चित करण्यासाठी प्राप्त झालेल्या हरकती, दुरुस्त्या आणि सुधारणा मागण्यांचे काटेकोर विश्लेषण करून त्यावर तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे. संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून माहितीची पडताळणी, दस्तऐवजांची शहानिशा, पत्ता बदल, नाव दुरुस्ती आणि नवीन नोंदी यासह सर्व बाबींचे व्यवस्थित वर्गीकरण केल्यास मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत राहते. प्रारूप मतदार याद्यावरील नागरिकांच्या हरकती व सूचना योग्य रीतीने पार पाडण्यासाठी अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करा. या प्रक्रियेत पारदर्शकता, ठोस वेळापत्रक आणि नागरिकांशी सातत्यपूर्ण संवाद राखल्यास निवडणूक व्यवस्थेवरचा विश्वास अधिक दृढ होतो आणि लोकशाही प्रक्रियेची भक्कम पायाभरणी होईल. असे देखील आयुक्त श्रावण हर्डीकर म्हणाले.

### निवडणुक संबधित अन्य विषयांचा घेतला आढावा..

» आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्ट्रॉंग रूम उभारणी, मतदार यादीतील दुबार नोंदणी हटवणे, मतदान केंद्रांची निश्चिती आणि आवश्यक ठिकाणी तात्पुरती मतदान केंद्रे उभारणे या बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. स्ट्रॉंग रूम सुरक्षेच्या उच्च मानकांनुसार उभारण्याचे निर्देश देण्यात आले असून मतदारांना मतदानासाठी कोणतीही अडचण येऊ नये, पारदर्शकता आणि सुरळीत निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. लवकरच मतदान केंद्राची स्वत: पाहणी करणार असल्याचे सांगत आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी मतदार केंद्र निश्चित करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

---

# कचरा व्यवस्थापनात सोसायट्यांचा सहभाग वाढविण्यासाठी महापालिकेकडून जनजागृती

## पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करण्यासाठी महापालिकेकडून सातत्याने जनजागृती

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड शहरातील कचरा कमी करून पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करण्यासाठी महापालिकेकडून सातत्याने जनजागृती मोहीम राबवली जात आहे. दररोज १०० किलो किंवा त्याहून अधिक कचरा निर्माण करणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्यांना स्वयंपूर्ण कचरा व्यवस्थापनासाठी महापालिका सर्वतोपरी सहकार्य करत असून अधिकाधिक सोसायट्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, आरोग्य कार्यकारी अधिकारी अमित पंडित यांच्या अधिपत्याखाली विविध अभिनव प्रकल्प राबविले जात आहेत.यामध्ये ओला–सुका कचरा विलगीकरण, होम कम्पोस्टिंग, शून्य कचरा प्रकल्प, तसेच आर.आर.आर. केंद्रांद्वारे (REDUCE–REUSE–RECYCLE) वस्तूंच्या पुनर्वापराला चालना देणे यांचा समावेश आहे.

कचरा व्यवस्थापनात प्रगती करणाऱ्या गृहनिर्माण संस्था, आस्थापने, हॉटेल व्यवसायिक आणि इतर मालमत्ता धारकांना प्रोत्साहन देण्यासाठी महापालिका मालमत्ता करातील सामान्य करावर विशेष सवलती उपलब्ध करून देत आहे. या प्रोत्साहनामुळे शहरातील अनेक सोसायट्या, शाळा, उद्योगसंस्था आणि आस्थापने कचरा व्यवस्थापनात पुढाकार घेत असून, कचरा संकलनावरील ताण कमी होण्यास मदत झाली आहे. परिणामी शहरात शाश्वत आणि वसुंधरास्नेही जीवनशैलीकडे वाटचाल वेगाने सुरू आहे.

### महापालिकेकडून मिळणाऱ्या कर सवलती..

» ऑन-साईट कम्पोस्टिंग युनिट कार्यान्वित असल्यास : ५% सामान्य करात सूट
» कम्पोस्टिंग युनिट + एसटीपी प्लांट कार्यान्वित असल्यास : ८% सामान्य करात सूट
» फक्त एसटीपी प्लांट कार्यान्वित असल्यास : ३% सामान्य करात सूट
» शून्य कचरा संकल्पना राबविल्यास : ८% सामान्य करात सूट
» शून्य कचरा प्रकल्प + एसटीपी दोन्ही कार्यान्वित असल्यास : १०% सामान्य करात सूट

“ पिंपरी चिंचवड महापालिका वसुंधरास्नेही शहर घडविण्यासाठी शाश्वत पावले उचलत आहे. कचरा व्यवस्थापनात नागरिक आणि सोसायट्यांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. स्वतःच्या परिसरात कचऱ्याचे कम्पोस्टिंग करणाऱ्या संस्था शहराच्या स्वच्छतेच्या खऱ्या भागीदार आहेत. अशा उपक्रमांना महापालिकेकडून सदैव प्रोत्साहन आणि सहकार्य दिले जाते.

- डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त,
पिंपरी चिंचवड महापालिका.

# पुण्यात मतदार यादीत अनेक घोळ!

## महाविकास आघाडीचे पदाधिकारी म्हणाले, अन्यथा निवडणूक नको...!

**पुणे | प्रतिनिधी**

'महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी पालिका प्रशासनाने प्रसिद्ध केलेल्या प्रारुप मतदारयादीमध्ये अनेक चुका असून, एका भागातील मतदारांची नावे दुसऱ्याच प्रभागात दाखविण्यात आली आहेत. या चुका दुरुस्त केल्याशिवाय निवडणूक घेण्यात येऊ नये,' अशी मागणी महाविकास आघाडीत सहभागी असलेल्या पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी केली.



'महापालिका प्रशासनाने तयार केलेल्या मतदारयादीत तीन लाखांपेक्षा अधिक मतदारांची दुबार नोंदणी झाल्याची कबुली महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनीच दिली आहे. प्रभागांची प्रारुप मतदारयादी तयार करताना त्यामध्ये इतर प्रभागातील मतदारांची नावे टाकण्यात आली आहेत. या सर्व प्रकारामुळे महापालिका प्रशासन राज्यात सत्ताधारी असलेल्या भाजपच्या प्रभावाखाली काम करत असल्याची शंका विरोधी पक्षांकडून व्यक्त केली जात आहे.

मतदारयादीत अनेक त्रुटी असतानाही महापालिकेने प्रारुप मतदारयादीवर हरकती नोंदवण्यासाठी केवळ ८ दिवसांचा कालावधी देण्यात आला. चुकीच्या पद्धतीने तयार करण्यात आलेली मतदारयादी पुढे तशीच रेटून आगामी निवडणुका घेण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव आहे,' असा आरोप महाविकास आघाडीकडून केला जात आहे.

'महापालिकेच्या प्रारुप मतदार यादीतील त्रुटी दूर केल्या जात नाही, तोपर्यंत निवडणूक घेण्यात येऊ नये,' अशी मागणी करून महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांची भेट घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), काँग्रेस, शिवसेना (ठाकरे) पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित बहुजन आघाडी, आम आदमी पार्टी, समाजवादी पक्षाचे पदाधिकाऱ्यांचा या शिष्टमंडळात सहभागी झाले होते.

'महापालिकेच्या हद्दीत राहत नसलेल्या नागरिकांना पुणे महानगरपालिकेचे मतदार बनविण्याचा प्रयत्न प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात अशी चूक होणे शक्य नाही. हा प्रकार जाणीवपूर्वक केल्याचे दिसत आहे. त्यामुळे निवडणूक कामात निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर लोक प्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या अनुषंगाने तातडीने कारवाई करावी. याबरोबरच 'प्रभाग क्रमांक ७ मधील मतदारयादीमधून खडकी कॅन्टोमेंट बोर्डातील एकाच यादीतील १ हजार २११ मतदारांची नावे वगळण्यात यावी,' अशी मागणी निकम यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे केली आहे.

### 'खडकी कॅन्टोन्मेंट'मधील नागरिकांची नावे मतदारयादीत

» 'निवडणुकीसाठी प्रारुप मतदारयादी तयार करताना प्रशासनातील अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी केलेली नाही, त्यामुळे अनेक त्रुटी राहिल्या,' असा आरोप स्थायी समितीचे माजी अध्यक्ष नीलेश निकम यांनी केला. शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघामध्ये पुणे महानगरपालिका, खडकी कॅन्टोमेंट बोर्डाचा भाग समाविष्ट आहे. महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ७ (गोखलेनगर-वाकडेवाडी) या प्रभागाची प्रारुप मतदारयादी तयार करताना खडकी कॅन्टोमेंट बोर्डाच्या परिसरातील इंदिरा झोपडपट्टीतील शिवाजीनगर विधानसभा यादी भाग क्रमांक ८२ मधील संपूर्ण नावे समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप निकम यांनी केला.

# मुंढव्यातील नावे वारज्यात; खेड शिवापूरमधील सन सिटीत!

## महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप मतदारयादीत अनेक घोळ असल्याच्या तक्रारी

**पुणे | प्रतिनीधी**

महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारुप मतदारयादीत अनेक घोळ असल्याच्या तक्रारी आहेत. मुंढवा येथील प्रभागातील मतदारांची नावे वारजेच्या प्रभागात, तर खेड शिवापूरमधील मतदारांची नावे सिंहगड रस्त्यावरील सन सिटीच्या प्रभागाच्या यादीत आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. अशा प्रकारचा घोळ झाल्याच्या माहितीला महापालिका प्रशासनानेही दुजोरा दिला आहे.




महापालिका प्रशासनाने मतदारांच्या याद्या फोडण्यासाठी ज्या सॉफ्टवेअरचा वापर केला. त्यामध्ये काही तांत्रिक अडचणी असल्याने अनेक प्रभागांतील मतदारांची नावे ही दुसऱ्या प्रभागांत गेल्याचे समोर आले आहे. एका प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्याच लोकसभा मतदारसंघात गेल्याचेही आढळले आहे. मुंढवा भागातील मतदारांची नावे ही वारजे येथील मतदारयादीत गेली आहेत.

बारामती लोकसभा मतदारसंघात समावेश असलेल्या खेड-शिवापूर भागातील अनेक मतदारांची नावे ही सिंहगड रस्त्यावरील सन सिटि प्रभागात, नवी पेठेतील एका सोसायटीतील मतदारांची नावे ही सन सिटि प्रभागात दाखविली गेली आहेत. महापालिका प्रशासनानेदेखील असे प्रकार झाल्याबाबत दुजोरा दिला असून, याबाबत राज्य निवडणूक आयोगाला कळविण्यात आल्याचे अधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, मतदारयादीत नाव शोधण्यासाठी नागरिकांनी, मतदारांनी HTTP://MAHASECVOTERLIST.IN/OBJECTIONONCLICK/SEARCHNAME या लिंकचा वापर करावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे म्हणाले, प्रभागातील एकाच कुटुंबातील मतदारांच्या नावांची फोड होऊन काही जण दुसऱ्या प्रभागात गेले असतील, तर त्यांची नावे पुन्हा एकत्र घेण्यासाठी नमुना 'ब' ची तरतूद आहे. त्यामध्ये आवश्यक दुरुस्ती केली जाईल. काही प्रभागांमध्ये मतदारांची पळवापळवी केली असल्यास संबंधित कर्मचारी अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. नागरिकांच्या, इच्छुक उमेदवारांच्या आणि मतदारांच्या तक्रारींची योग्य दखल घेतली जाईल.

### आरक्षणाबाबत 24 हरकती

» प्रभागात टाकण्यात आलेल्या आरक्षणाबाबत हरकती नोंदविण्यासाठी सोमवारपर्यंत मुदत होती. निवडणूक कार्यालयाकडे २४ हरकती प्राप्त झाल्या असुन, यामध्ये प्रभाग क्रमांक १ मध्ये सर्वाधिक सहा हरकती आल्या आहेत. या प्रभागातील एका गटात अनुसूचित जातीच्या महिलांसाठी आरक्षण टाकले आहे. हे आरक्षण पुरुषांसाठी बदलावे, अशी हरकत नोंदविली गेली. प्रभाग क्रमांक नऊमध्ये दोन हरकती आल्या आहेत. या ठिकाणी अनुसूचित जाती या वर्गाची संख्या दुप्पट झाली असून, येथे ते आरक्षण असणे आवश्यक असल्याचे हरकतीमध्ये म्हटले आहे.

### आतापर्यंत आल्या 419 हरकती, तक्रारी

» पुणे महापालिका प्रशासनाने मतदार यादी प्रसिद्ध केलेल्या दिवसापासूनच यादीमध्ये घोळ असल्याच्या तक्रारी केल्या जात आहेत. सोमवारी संध्याकाळपर्यंत निवडणूक कार्यालय आणि महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये ४१९ हरकती, तक्रारी प्राप्त झाल्याची माहिती निवडणूक विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

# आयटी पार्क हिंजवडीत अवजड वाहनांसाठी वेग मर्यादा निश्चित

## आयटी पार्क परिसरातील वाढते अपघात रोखण्यासाठी पोलिसांनी पाऊले उचलली

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्क परिसरातील वाढते अपघात रोखण्यासाठी पोलिसांनी पाऊले उचलली आहेत. जड, अवजड वाहनांसाठी वेगमर्यादा ३० किलोमीटर प्रतितास करण्यात येणार आहे. हिंजवडी आणि परिसरातील सर्व जड वाहनांना जीपीएस यंत्रणा बसवली जाणार आहे. स्पीड गनद्वारे वेगमर्यादा पालन होते किंवा कसे याची शहानिशा करण्यात येणार आहे.

हिंजवडीसह वाकड, रावेत, पुनावळे, ताथवडे परिसरात मोठमोठे गृहप्रकल्प उभारले जात आहेत. बांधकामासाठी लागणारा कच्चा माल पुरविणाऱ्या रेडी मिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्रकल्पांची संख्याही अधिक आहे. बांधकाम साहित्याची वाहतूक करणाऱ्या जड, अवजड वाहतुकीमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. मागील ११ महिन्यांत हिंजवडी, वाकड परिसरात अपघातामध्ये ३७ जणांचा मृत्यू झाला आहे. अवजड वाहनांना सकाळी आठ ते बारा आणि दुपारी चार ते रात्री नऊ वाजेपर्यंत बंदी केली आहे. तरीही जड, अवजड वाहने शहरात प्रवेश करीत आहेत.



वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर सोमवारी पोलीस आयुक्तालयामध्ये जड, अवजड वाहन व त्यामुळे होणारे अपघात यांना प्रतिबंध करण्यासाठी उपाय योजना संदर्भात बैठक झाली. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पीएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, वाहतूक विभागाचे उपायुक्त विवेक पाटील, परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, पिंपरी- चिंचवड प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) संदेश चव्हाण, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव यावेळी उपस्थित होते.

बेकायदेशीरपद्धतीने चालणाऱ्या रेडी मिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्रकल्प चालकांना पीएमआरडीएमार्फत काम थांबवण्यासाठी नोटीस देण्यात येईल. अनधिकृतपणे कार्यरत असलेल्या आरएमसी प्रकल्पावर निष्कासनाची कारवाई करण्यात येईल. जड, अवजड वाहनांसाठी वेगमर्यादा ३० किलोमीटर प्रतितास करण्यात येणार आहे. हिंजवडी आणि परिसरातील सर्व जड वाहनांना जीपीएस यंत्रणा बसवली जाणार आहे. यामुळे वाहनांचे नेमके स्थान, वेग, ब्रेकिंग दाबण्याची पद्धती आणि वाहन चालविण्याची पद्धती याची माहिती प्रत्यक्ष स्वरूपात मिळेल.

जड, अवजड वाहनांची सुरक्षा तपासणी केली जाणार आहे. वाहन चालकांचा परवाना तपासणी तसेच वाहन चालकांना वाहतुकीच्या नियमाबाबत जागरूकता व वाहतूक नियमांचे पालन यासाठी आरटीओ, वाहतूक विभाग आणि स्थानिक पोलिसांचे पथक संयुक्तरीत्या आरएमसी प्रकल्प असलेल्या ठिकाणीच प्रशिक्षण देणार आहेत. जड वाहनांच्या चालकांना ते चालविण्याचे योग्य प्रशिक्षण दिले जाणार आहे. डंपर, हायवा, मिक्सर या वाहनांच्या मागील चाकाखाली येऊन अपघात होत आहेत. त्यामुळे या वाहन चालकासोबत सहचालक, मदतनीस (क्लीनर) ठेवणे, बाजूनेचाक कव्हर करण्यासाठी बंपर, सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी आरटीओ विभागामार्फत कार्यवाही करण्यात येणार असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी चव्हाण यांनी सांगितले.

जड, अवजड वाहनांसाठी वेगमर्यादा ३० किलोमीटर प्रतितास करण्यात येणार आहे. हिंजवडी आणि परिसरातील सर्व जड वाहनांना जीपीएस यंत्रणा बसवली जाणार असल्याचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी सांगितले.

### दहा महिन्यात चिमुरडीसह सहा महिलांचा बळी

**» हिंजवडी परिसरात सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी अवजड वाहनांना बंदी आहे. मात्र, या बंदी आदेशाचे उल्लंघन करून अवजड वाहने सर्रासपणे प्रवेश करतात. या अवजड वाहनांनी गेल्या दहा महिन्यात पाच महिलांचा बळी घेतला. २४ जानेवारी रोजी हिंजवडी – माण रस्त्यावरील वडजाईनगर कॉर्नरजवळ भरधाव जाणारा रेडिमिक्स डंपर वळण घेताना अचानक पलटी झाला. त्याचवेळी दुचाकीवरून चाललेल्या दोन विद्यार्थिनी डंपरखाली सापडल्या आणि चिरडल्या गेल्या. यात प्रांजली यादव (वय २२) आणि अश्लेषा गावंडे (वय २२) या दोन्ही विद्यार्थिनींचा मृत्यु झाला.**


दुसरी घटना १२ ऑगस्ट रोजी हिंजवडी टप्पा दोन येथे इन्फोसिस कंपनीसमोर सायंकाळी घडली. मिक्सरने धडक दिल्याने प्रत्युषा बोराटे या ११ वर्षीय चिमुरडीचा मृत्यू झाला. १० ऑक्टोबर रोजी माण रस्त्यावरील पांडवनगर येथे भरधाव सिमेंट मिक्सर वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील भारती राजेश मिश्रा (वय ३०, रा. थेरगाव) या महिलेचा मृत्यु झाला. १७ नोव्हेंबर रोजी वडिलांसोबत दुचाकीवरून जात असताना डंपरची धडक बसून झालेल्या अपघातात तन्वी सिद्धेश्वर साखरे (वय २०) हिचा मृत्यू झाला. २१ नोव्हेंबर रोजी मिक्सरने धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकीवरील रिदा इमरान खान हिचा मृत्यू झाला.

# विमानतळावरील बिबट्याला पकडण्यासाठी प्रशासनाची पाहणी

## पुणे विमानतळावरील धावपट्टी आणि सीमाभींतीजवळ बिबट्या दिसल्याची तक्रार

**पुणे | प्रतिनीधी**

लोहगाव येथील पुणे विमानतळावरील धावपट्टी आणि सीमाभींतीजवळ बिबट्या दिसल्याची तक्रार आल्याने वन विभाग आणि हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी सोमवारी दुपारी पाहणी केली. बिबट्या दिसलेल्या भागात तीन न कॅमेरे बसविण्यात आले असून तेथील भुयारी मार्गांना जाळ्या बसविण्यात आल्या आहेत. ट्रॅपमध्ये पुन्हा बिबट्या दिसल्यास त्याला पकडण्यासाठी सापळा रचून पिंजरे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.



पुणे विमानतळावर गेल्या वर्षभरापासून एक बिबट्या मुक्काम ठोकून आहे. गेल्या वर्षी डिसेंबरच्या सुरुवातीला धावपट्टीवर बिबट्याने दर्शन दिले होते. त्यानंतर प्रवाशांमध्ये भीती पसरल्याने विमानतळ प्रशासनाने वन विभाग आणि रेस्क्यू बचाव पथकाची मदत घेतली. बिबट्याचा वावर असलेल्या भागात कॅमेरा ट्रॅप बसविण्यात आले, पिंजरे बसविण्यात आले होते. बचाव पथकांने बरेच दिवस बिबट्याच्या शोधात विमानतळ पिंजून काढला होता. पण बिबट्या हाती आला नाही. महिनाभरानंतर बिबट्याची चर्चा थांबली होती, मात्र, गेल्या आठवड्यात पुन्हा एकदा बिबट्याने विमानतळावर नागरिकांना दर्शन दिले, त्याचे फोटोही कैद झाल्यामुळे प्रशासन सक्रीय झाले आहे.

सुरक्षेचा उपाय म्हणून वन विभाग, रेस्क्यू बचाव पथक आणि हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी विमानतळाच्या धावपट्टी, परिसराची पाहणी केली. या वेळी सहायक वनसंरक्षक मंगेश ताटे, भारतीय हवाई दलाचे विंग कमांडर वाय. एस. सिंग, परिक्षेत्र वन अधिकारी सुरेश वारक, शीतल खेंडके, प्रमोद रासकर आणि रेस्क्यूचे किरण राहळकर उपस्थित होते.

बिबट्या दिसलेल्या परिसरात फिरून करून तेथे नवीन तीन कॅमेरे ट्रॅप बसविण्यात आले. त्या परिसरातील विविध खंदक, भुयारी मार्ग, बोगद्यांचीही सखोल पाहणीही करण्यात आली.भारतीय हवाई दलाने आता या बोगद्यांमध्ये बिबट्या लपून बसणार यासाठी लोखंडी जाळ्या बसवल्या आहेत. मात्र, विमानतळावरील गवताळ भाग आणि झुडुपांमध्ये तो लपण्याची शक्यता असल्याने कॅमेरा ट्रॅपी संख्या वाढविण्याबाबतही या वेळी चर्चा झाली. बिबट्या पुन्हा दिसल्यास त्याला पकडण्यासाठी पिंजरा ठेवण्याचाही निर्णय घेण्यात आला.